# जिल्हा परिषद रत्नागिरी
## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन
## माळनाका, रत्नागिरी - ४१५६१२
## सामान्य प्रशासन विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुरध्वनी क्र. ०२३५२ - २२२४२८ ई-मेल :- dyceogad08@gmail.com


जा.क्र. रजिप/साप्रवि/आस्था-३/अ.र.रो./३४९० /२०२२ दिनांक २६/०८/२२

**वाचा :-**
१) श्री. विनायक नारायण शिंदे, कनिष्ठ सहाय्यक लिपिक, यांचा शिल्लक रजेचा हिशेब.
२) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,रत्नागिरी यांचेकडील सेवानिवृत्ती आदेश क्र. रजिप/साप्रवि/आस्था- ३/से.नि./ ३३७९/२०२२ दिनांक २४.८.२०२२
३) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ नियम ६८
४) शासन वित्त विभाग निर्णय क्र.अरजा/२४०१/८ सेवा दिनांक १५ जानेवारी २००१
५) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,रत्नागिरी यांचे आदेश क्र.रजिप/साप्रवि/ग-२/ डेलिगेशन/११२१० दिनांक ४.१२.१९९२.
६) शासन वित्त विभाग,निर्णय क्र.अरजा-२००९/प्र.क्र.२१/सेवा-६ दिनांक २७ ऑगस्ट २००९
७) कार्यालयीन मंजूर टिप्पणी दिनांक :- २६/८/२०२२

**आदेश :-**

श्री. विनायक नारायण शिंदे, कनिष्ठ सहाय्यक लिपिक, हे दिनांक ३१.८.२०२२ रोजी मध्यान्होत्तर पासून जिल्हा परिषद सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत.

संदर्भ क्र. १ प्रमाणे सेवापुस्तकातील अर्जित रजा लेख्याची पडताळणी करता श्री. विनायक नारायण शिंदे, कनिष्ठ सहाय्यक लिपिक, यांचे सेवानिवृत्तीचे तारखेस शिल्लक असलेल्या ३०० दिवस अर्जित रजेचे रोखमुल्य याद्वारे मंजूर करण्यांत येत आहे.

श्री. विनायक नारायण शिंदे, कनिष्ठ सहाय्यक लिपिक, यांना सदर रजा वेतनावर सेवानिवृत्तीचे तारखेस अनुज्ञेय असलेल्या दराने महागाई भत्ता धरुन ठोक रक्कम मिळेल. घरभाडे भत्ता देय नाही. सदर रक्कमेतून निवृत्तीवेतनाची अगर निवृत्तीवेतनादी फायद्याची वजावट होणार नाही.

भविष्यामध्ये संबंधित कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनामध्ये किंवा अनुज्ञेय महागाई भत्त्यामध्ये वाढ झाल्यास संबंधित कार्यालय प्रमुख यांनी देय रोखमुल्य व दिलेले रोखमुल्य याचे फरकाचा आदेश आपले स्तरावरुन निर्गमित करावा.

सदरचा आदेश रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या https://www.zpratnagiri.org या संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आला असुन त्यांचा संकेतांक क्रमांक 202208261075 असा आहे.

**अर्जित रजेचे रोखमूल्य खालील सूत्रानुसार आदा करावे.**

शिल्लक अर्जित रजेचे रोखमूल्य = (वेतन + सेवानिवृत्तीचे तारखेस त्यावर अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता) / ३० x (शिल्लक अर्जित रजेचे दिवस - ३००) / १

(२९३०० + ९९६२) / ३० x ३०० / १ = **३,९२,६२०/-**

सही/-
(शेखर सावंत)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
जिल्हा परिषद रत्नागिरी

**प्रत :- माहितीसाठी व कार्यवाहीसाठी**
१) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प. रत्नागिरी
२) वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र दादर, चिपळूण, जिल्हा परिषद रत्नागिरी

२/- सदर अर्जित रजा रोखमूल्य देयक मंजूरीची नोंद सेवापुस्तकांत ठेवून सदरचे सेवापुस्तक पुन:श्च या कार्यालयाकडे सादर करणेत यावे.

३) श्री. विनायक नारायण शिंदे, कनिष्ठ सहाय्यक लिपिक,यांना कार्यालयामार्फत.

(शेखर सावंत)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
जिल्हा परिषद रत्नागिरी